# डॉ. शिंदे महाविद्यालय-इलेक्ट्रिकल हायटेक यांच्यात करार

**जनप्रवास : गडहिंग्लज**



भडगाव येथील डॉ. ए. डी. शिंदे अभियांत्रिकी महाविद्यालय आणि इलेक्ट्रिकल हायटेक प्रा. लि. यांच्यात सामंजस्य करार झाला. या करारानुसार विद्यार्थी, शिक्षक आणि रोबोसॅपचे कर्मचारी यांच्यासाठी तज्ज्ञांची व्याख्याने, तंत्रज्ञान, प्रशिक्षण कार्यशाळा, अभ्यास भेट, संसाधनाची देवाणघेवाण, प्रायोजित प्रकल्प असे उपक्रम राबविले जातील. या करारान्वये इच्छुक विद्यार्थ्यांना इंटर्नशिप द्वारे आवश्यक कौशल्ये विकसित करून त्यांची विविध ठिकाणी नियुक्ती केली जाईल, असे इलेक्ट्रिकल हायटेकचे शाखा व्यवस्थापक मनीष कुलकर्णी यावेळी म्हणाले. या करारान्वये इलेक्ट्रिकल हायटेक कर्मचाऱ्यांना आवश्यक तांत्रिक ज्ञान देण्यासाठी डॉ. ए. डी. शिंदे कॉलेज तर्फे प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित केल्या जातील, असे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. व्ही. घेवडे यांनी सांगितले.

या सामंजस्य करारांतर्गत इलेक्ट्रिकल हायटेक प्रा. लि. यांच्या सहकार्याने महाविद्यालयात औद्योगिक उपयोगासाठी पीसीबी डिझाईन लॅब विकसित करण्यात येणार आहे. या प्रयोगशाळेमध्ये औद्योगिक दर्जाचे पीसीबी डिझाईन, सर्किट लेआउट, प्रोटोटायपिंग, फॅब्रिकेशन, असेंब्ली तसेच टेस्टिंगची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या औद्योगिक पीसीबी डिझाईन लॅबमुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उद्योगामध्ये वापरल्या जाणाऱ्या तंत्रज्ञानावर आधारित प्रशिक्षण मिळणार असून, इंडस्ट्री-रेडी प्रकल्प विकसित करण्याची संधी प्राप्त होणार आहे. या करारामुळे उद्योग आणि शिक्षणसंस्था यांच्यातील दुवा अधिक मजबूत होऊन विद्यार्थ्यांची रोजगारक्षमता वाढण्यास मोठी मदत होणार आहे.

या प्रसंगी इलेक्ट्रिकल हायटेकचे शाखा व्यवस्थापक मनीष कुलकर्णी, प्राचार्य डॉ. डी. व्ही. घेवडे, डिप्लोमाचे प्राचार्य डॉ. संजयकुमार इंगळे, रजिस्ट्रार हेमंत करीगार, प्रा. महादेव बंदी उपस्थित होते. याकामी संस्थाध्यक्षा श्रीमती उर्मिलादेवी शिंदे, सचिव प्रा. स्वाती कोरी व सल्लागार महेश कोरी यांचे प्रोत्साहन लाभले.

पुढारी

# शिंदे अभियांत्रिकी महाविद्यालय, इलेक्ट्रोटेक यांच्यात सामंजस्य करार

**गडहिंग्लज :** विद्यार्थ्यांना उद्योगाभिमुख शिक्षणासोबतच प्रत्यक्ष प्रशिक्षणाची संधी उपलब्ध व्हावी, या उद्देशाने भडगाव (ता. गडहिंग्लज) येथे डॉ. ए. डी. शिंदे अभियांत्रिकी महाविद्यालय आणि इलेक्ट्रोटेक एंटरप्रायझेस यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. इलेक्ट्रोटेक एंटरप्रायझेसचे संचालक शक्ती चौगुले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. डी. व्ही. घेवडे यांनी या करारांतर्गत इलेक्ट्रोटेक एंटरप्रायझेसच्या कर्मचाऱ्यांसाठी आवश्यक तांत्रिक ज्ञान देण्यासाठी डॉ. ए. डी. शिंदे अभियांत्रिकी महाविद्यालयामार्फत विशेष प्रशिक्षण कार्यशाळांचे आयोजन करण्यात येईल. या उपक्रमासाठी संस्थाध्यक्षा ऊर्मिला शिंदे, सचिव स्वाती कोरी, सल्लागार महेश कोरी यांचे प्रोत्साहन मिळाले.

My Kolhapur Edition
Jan 15, 2026 Page No. 10
Powered by: erelego.com

पुण्य नगरी

# शिंदे अभियांत्रिकी व इलेक्ट्रिकल हायटेक प्रा. लि. यांच्यात करार

**गडहिंग्लज : प्रतिनिधी**

भडगाव (ता. गडहिंग्लज) येथील डॉ. ए. डी. शिंदे अभियांत्रिकी महाविद्यालय आणि इलेक्ट्रिकल हायटेक प्रा. लि. यांच्यात सामंजस्य करार झाला. या करारानुसार विद्यार्थी, शिक्षक आणि रोबोसॅपचे कर्मचारी यांच्यासाठी तज्ज्ञांची व्याख्याने, तंत्रज्ञान, प्रशिक्षण कार्यशाळा, अभ्यास भेट, संसाधनाची देवाण-घेवाण, प्रायोजित प्रकल्प असे उपक्रम राबवले जातील.

या करारान्वये इच्छुक विद्यार्थ्यांना इंटर्नशिपद्वारे आवश्यक कौशल्ये विकसित करून त्यांची विविध ठिकाणी नियुक्ती केली जाईल, असे इलेक्ट्रिकल हायटेकचे शाखा व्यवस्थापक मनीष कुलकर्णी यांनी सांगितले. प्राचार्य डॉ. डी. व्ही. घेवडे यांनी या करारान्वये इलेक्ट्रिकल हायटेक कर्मचाऱ्यांना आवश्यक तांत्रिक ज्ञान देण्यासाठी कार्यशाळा आयोजित केल्या जातील जाणार आहेत, असे सांगितले. सामंजस्य करारांतर्गत इलेक्ट्रिकल हायटेक प्रा. लि. यांच्या सहकार्याने महाविद्यालयात औद्योगिक उपयोगासाठी पीजीबी डिझाईन लॅब विकसित करण्यात येणार आहे. या प्रयोगशाळेमध्ये औद्योगिक दर्जाचे पीसीबी डिझाईन, सर्किट लेआऊट, प्रोटोटायपिंग, फॅब्रिकेशन, असेंब्ली तसेच टेस्टिंगची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उद्योगामध्ये वापरल्या जाणाऱ्या तंत्रज्ञानावर आधारित प्रशिक्षण मिळणार आहे. या करारामुळे उद्योग आणि शिक्षण संस्था यांच्यातील दुवा अधिक मजबूत होऊन विद्यार्थ्यांची रोजगारक्षमता वाढण्यास मोठी मदत होणार आहे.

यावेळी प्राचार्य डॉ. संजयकुमार इंगळे, हेमंत करीगार, प्रा. महादेव बंदी उपस्थित होते. याकामी संस्थाध्यक्षा उर्मिला शिंदे, सचिव स्वाती कोरी व सल्लागार महेश कोरी यांचे प्रोत्साहन लाभले.



**भडगाव : डॉ. ए. डी. शिंदे महाविद्यालय व इलेक्ट्रिकल हायटेक यांच्यात सामंजस्य करारप्रसंगी प्राचार्य डॉ. डी. व्ही. घेवडे व मनीष कुलकर्णी.**

Kolhapur Edition

Dec 24, 2025 Page No. 04

Powered by: erelego.com